**शपथेवर उलटतपासणी गैरअर्जदार क्र. ०१,०३,०४ व मूळ गैरअर्जदार क्र.०२ चे वारस क्र.०२/०२, ०२/०३,०२/०८ व ०२/०९ तर्फे विधिज्ञ श्री. एस.पी.सानप यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

०१. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २०/१२/१९८७ रोजी मी वयाची १८ वर्षे पूर्ण केली नव्हती, दिनांक २०/१२/१९८७ रोजी माझे कुटूंबामध्ये माझे वडील, काका, भाउ हयात होते. हे म्हणणे खरे आहे की, सामान्यपणे अंत्यविधी करीता १८ वर्षांखालील व्यक्ती जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, पहूर, पाथरशेत व जामगाव येथील शेतजमीनी महाराष्ट्र शासनाने संपादित केल्या आहेत, प्रस्तुत अर्जातील गैरअर्जदार व मी दरम्यान उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे शेती संपादन मोबदल्याच्या अनुषंगाने अर्ज प्रलंबीत आहे.

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचे मृत्यूचे कारण नमुद केलेले नाही, त्याचप्रमाणे त्यांचा अंत्यविधी कुठे झाला, अंत्यविधीचेवेळी किती लोक हजर होते या बाबी देखील माझे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अज्ञान असल्यामूळे यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचे अंत्यविधीकरीता गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचे नावाने मौजे पहूर येथे मिळकती आहेत, सदर मिळकती देखील शासनाने संपादित केल्या आहेत, त्या मिळकतीचे मोबदल्याचे अनुषंगाने मी व गैरअर्जदार मध्ये वाद आहेत.

०३. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचेसोबत माझे काय नाते आहे, हे दर्शविणारा लेखी पुरावा मी अभिलेखावर दाखल केला नाही.

प्रश्न – यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचा मृत्यू दिनांक २०.१२.१९८७ रोजी झाल्याचे तुम्ही तुमचे सोयीप्रमाणे नमुद केले.

उत्तर – त्याचा मृत्यू दिनांक २०.१२.१९८७ रोजी चे दरम्यान झाल्याचे मला समजले होते.

०४. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचा मृत्यू दिनांक

२०.१२.१९८७ रोजी झाल्याचे मला इतरांकडून कळले, ती माहिती माझे वकीलांना प्रतिज्ञापत्र तयार करतेवेळी दिली.

०५. हे म्हणणे खरे नाही की, यशवंत लक्ष्मण कुर्ले यांचा मृत्यू दिनांक १०.१२.१९८७ रोजी झाला होता, मी अभिलेखावर खोटे शपथपत्र दाखल केले व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**शपथेवर उलटतपासणी गैरअर्जदार क्र. ०१,०३,०४ व मूळ गैरअर्जदार क्र.०२ चे वारस क्र.०२/०२, ०२/०३,०२/०८ व ०२/०९ तर्फे विधिज्ञ श्री. एस.पी.सानप यांनी केलेली उलटतपासणी गैरअर्जदार क्र. ०२ चे इतर वारस चे विधीज्ञ श्री. एम.डी.पाटील यांनी स्वीकारली.**

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्थळ : रोहा.
दि.२२.०२.२०२४

--सही--
(एस. एस. महाले)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.

(डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामूळे प्रस्तुतचा दस्त डीजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)